मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महापालिकेत मोठा फेरबदल

## 10 क्षेत्रीय कार्यालये व 272 कर्मचाऱ्यांच्या बदल्या, बांधकाम परवानगी विभागासह अनेक महत्त्वाच्या पदांमध्ये नवी नियुक्ती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आठचे दहा क्षेत्रीय कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. या फेररचनेमुळे तब्ब 272 कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये लिपिक, मुख्य लिपिक, कनिष्ठ अभियंते, उपअभियंते यांचा समावेश आहे.

या बदल्यांमध्ये 75 कनिष्ठ अभियंते, 36 उपअभियंते, 103 लिपिक आणि 58 मुख्य लिपिकांचा समावेश आहे. या निर्णयामुळे क्षेत्रीय कार्यालयांपासून ते तांत्रिक व प्रशासकीय शाखांपर्यंत कामकाजाचा नवीन रचना तयार होणार आहे. त्यामुळे प्रशासन अधिक गतिमान होणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.



महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतलेल्या निर्णयानुसार 8 क्षेत्रीय कार्यालयांची फेररचना करून आता दहा क्षेत्रीय कार्यालये स्थापन करण्यात आले आहेत. एक जुलैपासून दहा क्षेत्रीय कार्यालयांनुसार कामकाज सुरू होणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. आवश्यकतेनुसार उर्वरित कर्मचाऱ्यांच्याही बदल्या टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहेत.

पूर्वी होती त्याच ठिकाणी अ ते ह क्षेत्रीय कार्यालयांचे कार्यालय असणार आहेत. नव्याने झालेले ज क्षेत्रीय कार्यालय हे ताथवडे येथील महापालिकेच्या वाहनतळ इमारतीमध्ये असणार आहेत. तर, ल क्षेत्रीय कार्यालय पिंपरी येथील संत तुकारामनगर पोलिस ठाण्यासमोरील म्हाडाच्या इमारतीमध्ये सुरू होणार आहे.

### बांधकाम परवानगी विभाग मनोज सेठियांकडे

» शहर अभियंता मकरंद निकम यांनी 28 फेब्रुवारीला सेवानिवृत्ती घेतली आहे. तेव्हापासून शहर अभियंता हे पद रिक्त आहे. त्या पदाचे कामकाज मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता मनोज सेठिया, सहशहर अभियंता सुनील भागवानी यांच्याकडे सोपवण्यात आले होते. सहशहर अभियंता भागवानी यांच्याकडे असेलेले बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कामकाज आता सहशहर अभियंता सेठिया यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. दरम्यान, स्थापत्य विभागाचे उपअभियंता सुदर्शन वहिकर यांची कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे.

---

# भजनाच्या ठेक्यावर पिंपळे सौदागरमध्ये रंगली योगसाधना; आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पिंपळे सौदागर येथील शिवछत्रपती लिनिअर अर्बन गार्डन येथे सामूहिक योग व प्राणायाम शिबिराचे आयोजन करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पिंपळे सौदागर येथील शिवछत्रपती लिनिअर अर्बन गार्डन येथे रविवारी (दि.२१) सकाळी सामूहिक योग व प्राणायाम शिबिराचे आयोजन करण्यात आले. भारतीय जनता पार्टी रहाटणी-पिंपळे सौदागर आणि द आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेविका कुंदा भिसे, नगरसेविका अनिता काटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पवना सहकारी बँकेचे संचालक जयनाथ काटे, संदेश काटे, संजय भिसे, संदीप काटे, दिनेश काटे, मनोज ब्राम्हणकर तसेच द आर्ट ऑफ लिव्हिंगचे अमित मगर, राजेश पाटील, सुप्रिया पाटील, प्रविण कुंजीर, बाळकृष्ण परघळे, दीपक गांगुर्डे, समीर देवरे, विजय पाटील, शितल पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते द आर्ट ऑफ लिव्हिंगचे सत्यजित भैया यांचे मार्गदर्शन. भजनाच्या चैतन्यमय ठेक्यावर त्यांनी उपस्थितांकडून विविध योगासने व प्राणायाम करून घेतले. संगीत आणि योग यांचा सुंदर संगम अनुभवताना नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. योगाचे महत्त्व, योग्य पद्धती आणि दैनंदिन जीवनातील त्याची उपयुक्तता याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अवघ्या पाच वर्षांच्या सई थेऊरकर हिने व्यासपीठावरून कठीण योगासने सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच प्रीती मानकर यांनी संगीताच्या तालावर 'टाळी योगा' या नाविन्यपूर्ण योगप्रकाराचे सादरीकरण करून कार्यक्रमात वेगळी रंगत आणली.

याप्रसंगी बोलताना शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, "योग ही केवळ शारीरिक व्यायामाची पद्धत नसून शरीर, मन आणि आत्म्याला जोडणारे एक शास्त्र आहे. आधुनिक जीवनशैलीत मानसिक शांतता आणि उत्तम आरोग्यासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे भारताची योग परंपरा आज जागतिक स्तरावर पोहोचली आहे. प्रत्येक नागरिकाने 'रोज योग, रोज आरोग्य' हा संकल्प अंगीकारावा."

या योग शिबिरात परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आणि लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर बिरारी यांनी केले.

# पीएमआरडीए–महारेल करार; वाहतूककोंडी कमी होणार, उड्डाणपूल प्रकल्पांना गती

## रेल्वे फाटकमुक्ती आणि भुयारी मार्ग प्रकल्पांना गती; मात्र रिंगरोड कामाला भूसंपादनामुळे विलंब सुरूच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेशातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी आणि रेल्वे फाटकांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (महारेल) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. या करारामुळे रेल्वे उड्डाणपूल आणि रेल्वे मार्गाखालील भुयारी मार्ग यांच्या बांधकामाला गती मिळणार असून, प्रदेशातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री तथा पीएमआरडीएचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी पुणे महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन रेल्वे फाटकमुक्तीचा विशेष उपक्रम हाती घेतला होता. रेल्वे मार्गावरील उड्डाणपूल, पादचारी पूल (एफओबी) आणि भुयारी मार्ग यांची कामे विविध यंत्रणांमार्फत करण्याऐवजी रेल्वे प्रकल्पांचा अनुभव असलेल्या महारेलमार्फत राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले होते.

त्याअनुषंगाने पीएमआरडीए आणि महारेल यांच्यात अनेक बैठका झाल्यानंतर सामंजस्य कराराचा मसुदा अंतिम करण्यात आला. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी आणि महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जयस्वाल यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी दोन्ही संस्थांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या करारामुळे पुणे महानगर प्रदेशातील अनेक रेल्वे फाटकांवरील वाहतूक अडथळे दूर होण्यास मदत होणार आहे. रेल्वे फाटकांमुळे वाहनांच्या लागणाऱ्या लांबच लांब रांगा कमी होतील, प्रवासाचा वेळ व इंधनाची बचत होईल आणि नागरिकांना अधिक सुरक्षित व वेगवान वाहतुकीचा लाभ मिळेल. तसेच, प्रदेशाच्या पायाभूत विकासाला चालना मिळून आर्थिक आणि नागरी विकासाचा वेगही वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### भूसंपादन रखडल्याने रिंगरोडला विलंब

**» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या अंतर्गत रिंगरोड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम अपेक्षेपेक्षा संथ गतीने सुरू असून, भूसंपादन प्रक्रियेत अडथळे निर्माण झाल्याने प्रकल्पाला विलंब होत आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या सोलू इंटरचेंज ते वडगाव शिंदे या सुमारे 4.70 किलोमीटर लांबीच्या मार्गाची आखणी करण्यात आली आहे. संबंधित खासगी जमिनींचे मूल्यांकन पूर्ण झाले असले तरी काही भूखंडांच्या संपादनाची प्रक्रिया अद्याप प्रलंबित असल्याने प्रत्यक्ष कामाला वेग मिळू शकलेला नाही.**

### वाहतूककोंडी होणार कमी

**» दरम्यान, आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पहिल्या टप्प्यातील प्रत्यक्ष कामाला गती मिळेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. रिंगरोड पूर्ण झाल्यानंतर लोहेगाव, विमानतळ परिसर, आयटी पार्क तसेच पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यातील वाहतूककोंडी कमी होण्यास मदत होणार असून, चऱ्होली ते वाघोली दरम्यानचा प्रवास अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.**

राज्य रस्ते विकास महामंडळाच्या बाह्य रिंगरोडशी हा अंतर्गत रिंगरोड सोलू परिसरात जोडला जाणार आहे. जिल्ह्याच्या प्रादेशिक आराखड्यात सुरुवातीला 90 मीटर रुंदीचा प्रस्तावित असलेला हा रस्ता पुढे 110 मीटर करण्यात आला होता. त्यानंतर 2021 मध्ये तो 65 मीटर रुंदीचा करण्यात आला आणि 2023 मध्ये अवघड वळणे टाळून सुधारित आराखडा निश्चित करण्यात आला आहे. एकूण सुमारे 83 किलोमीटर लांबीच्या या रिंगरोडचे पाच टप्प्यांत बांधकाम होणार आहे. मात्र, पुढील काही टप्प्यांना गावकऱ्यांचा विरोध असल्याने संपूर्ण प्रकल्पाच्या प्रगतीवर परिणाम होत आहे.

---

# पिंपरीत PMPML बसचालकांकडून सिग्नल उल्लंघन; प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

## वर्दळीच्या चौकांमध्ये बसकडून वारंवार नियमभंग; नागरिकांकडून कठोर कारवाई आणि सीसीटीव्ही तपासणीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोरवाडी चौक, वल्लभनगर, शगुन चौक, नाशिक फाटा या वर्दळीच्या चौकांमध्ये पीएमपीएमएल बसचालकांकडून वाहतूक सिग्नलचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. लाल सिग्नल असतानाही बस पुढे नेणे, पादचारी मार्ग ओलांडणे आणि घाईगडबडीत चौक पार करण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एक प्रकारे पीएमपीचालक वाहतुकीच्या नियमांचा तिलांजली देताना दिसून येत आहेत; परंतु वाहतूक पोलिस याकडे दुर्लक्ष करत आहेत.

शहरातील वर्दळीचे चौक, बीआरटी मार्गावरील जंक्शन तसेच प्रमुख रस्त्यांवर पीएमपी बसकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे अनेक वाहनचालक आणि नागरिकांचे म्हणणे आहे. मोठ्या आकाराच्या बस वेगात सिग्नल तोडून गेल्यास अपघाताची शक्यता अधिक वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून चालावे लागत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते.

काही चौकांमध्ये सिग्नल हिरवा होण्याची प्रतीक्षा करणाऱ्या वाहनांच्या समोरून बस पुढे निघून जात असल्याने वाहतुकीत गोंधळ निर्माण होत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पीएमपी प्रशासनानेच वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे अपेक्षित आहे. मात्र, काही चालकांकडून वेळेच्या दबावाखाली किंवा निष्काळजीपणामुळे नियम धाब्यावर बसवले जात असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे.

वाहतुकीच्या नियमानुसार लाल सिग्नल तोडणे हा गंभीर वाहतूक गुन्हा आहे. मोठ्या बसकडून होणारे असे उल्लंघन केवळ इतर वाहनचालकांसाठीच नव्हे, तर पादचाऱ्यांसाठीही धोकादायक ठरू शकते. एखादी छोटी चूकही मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकते



**“ सिग्नल परिसरात गतिरोधक उभारणीची सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महापालिका आणि पीएमपी वाहतूक विभागाच्या संयुक्त बैठकीत महापालिकेला केली आहे. तसा महापालिकेच्या बैठकीत निर्णय झाला आहे. तरी तो लवकरच लागू होईल. नियम तोडून सर्रासपणे भरवेगाने सिग्नल तोडणाऱ्या बसचालकांवर स्कोड थ्रो कारवाई केली जात आहे. तसे काही आढळून आल्यास बसचा फोटो काढून पीएमपी प्रशासनाला पाठवल्यास त्याचा फाइन बसचालकाच्या खिशातून कापला जातो.**

**- अमित डोळस, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग,**

पीएमपी बसचालकांकडून होणाऱ्या सिग्नल उल्लंघनाच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी चौकांमधील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करावी, नियम तोडणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करावी आणि बसचालकांना नियमित प्रशिक्षण देण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नालेसफाईवर 164 कोटींचा खर्च; तरीही पाणी साचण्याच्या समस्या कायम

## महापालिकेची माहिती उघड; कोट्यवधींच्या खर्चानंतरही कर्वेनगर, कोथरूड, हडपसरसह अनेक भागांत जलसाठ्याची पुनरावृत्ती

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळापूर्वी करण्यात येणारी नालेसफाई आणि पावसाळी गटारांमधील गाळ काढण्यासाठी गेल्या सहा वर्षांमध्ये १६४ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नगरसेवक दत्तात्रय बहिरट यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नाला उत्तर देताना महापालिकेने गेल्या सहा वर्षांतील आकडेवारी दिली आहे.

नगरसेवक दत्ता बहिरट यांनी २०१७ ते २०२६ या कालावधीतील खर्चाची माहिती मागविली होती. मात्र प्रशासनाने २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीतीलच आकडेवारी सादर केली.

महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सन २०२०-२१ मध्ये १४ निविदांसाठी सुमारे ३८ कोटी रुपये, २०२१-२२ मध्ये १५ निविदांसाठी ३३ कोटी रुपये, २०२३-२४ मध्ये १७ निविदांसाठी ४२ कोटी रुपयांहून अधिक आणि २०२४-२५ मध्ये १७ निविदांसाठी ४१ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. एकूण खर्चापैकी नालेसफाईवर १२१ कोटी, तर पावसाळी चेंबरमधील गाळ काढण्यासाठी ४३ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

दर वर्षी कोट्यवधी रुपये खर्च होऊनही कर्वेनगर, कोथरूड, सिंहगड रस्ता, हडपसर, कात्रज, वारजे तसेच मध्यवर्ती भागांमध्ये मुसळधार पावसानंतर पाणी साचण्याच्या तक्रारी कायम आहेत. त्यामुळे नालेसफाईवर एवढा खर्च होऊनही समस्या कायम असल्याचे चित्र आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वक कामाच्या निविदा महापालिका प्रशासनाच्या वतीने काढण्यात येतात. पावसाळा सुरू होण्यापूर्वी नाल्यातील तसेच पावसाळी गटारा मधील गाळ काढून ती स्वच्छ करणे ही महापालिकेची जबाबदारी असते. त्यासाठी महापालिका निविदा काढून काम देते. ठेकेदाराला काम दिल्यानंतर पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करणे आवश्यक असते. मात्र गेल्या काही वर्षांपासून पावसाळा सुरू झाल्यानंतर कामे सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालकांचे तसेच नागरिकांची गैरसोय झाल्याचे प्रकारही समोर आले आहेत.




### १६४ कोटींचा खर्च, प्रश्न मात्र कायम

**» पुणे महापालिकेने २०२०-२१ ते २०२५-२६ या सहा वर्षांत नालेसफाई आणि पावसाळी गटारांमधील गाळ काढण्यासाठी तब्बल १६४ कोटी रुपये खर्च केल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये १२१ कोटी रुपये नालेसफाईवर तर ४३ कोटी रुपये पावसाळी चेंबरमधील गाळ काढण्यावर खर्च करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक दत्तात्रय बहिरट यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ही आकडेवारी देण्यात आली. मात्र एवढा खर्च करूनही शहरातील अनेक भागांत पावसाळ्यात पाणी साचण्याच्या तक्रारी कायम असल्याने कामांच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**

### जलसाठ्याच्या तक्रारींचा पाऊस

**» कर्वेनगर, कोथरूड, सिंहगड रस्ता, हडपसर, कात्रज, वारजे तसेच मध्यवर्ती पुण्यात दरवर्षी मुसळधार पावसानंतर रस्त्यांवर पाणी साचण्याच्या घटना घडतात. नालेसफाईसाठी कोट्यवधी रुपये खर्च होत असतानाही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा दिसत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. गेल्या महिन्यात झालेल्या अवकाळी पावसातही अनेक रस्त्यांवर पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. पावसाळी गटारे आणि नाल्यांची स्वच्छता वेळेत पूर्ण न झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.**

### कमी दराच्या निविदांमुळे गुणवत्तेवर प्रश्न

**» नालेसफाईच्या अनेक कामांसाठी ठेकेदारांनी पूर्वगणन पत्रकापेक्षा ३० ते ५० टक्के कमी दराने निविदा भरल्याची बाब समोर आली आहे. विशेषतः हडपसर-मांजरी, वारजे-कर्वेनगर आणि सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत अशा निविदांची संख्या अधिक असल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेबाबत शंका व्यक्त केली जात आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतरही काही ठिकाणी नालेसफाईची कामे सुरू असल्याचे चित्र दिसत असल्याने प्रशासनाच्या नियोजनावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.**

# पुण्यातील पाणीटंचाई तीव्र... जलतरण तलाव, वॉशिंग सेंटर बंद, बांधकामांसाठी पिण्याचे पाणी वापरल्यास दंड

## पुण्यातील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने जलतरण तलाव आणि वॉशिंग सेंटर्स बंद ठेवण्याचे आदेश दिले

**पुणे | प्रतिनिधी**

धरणातील पाणीसाठा कमी झाला असून, पावसाने दिलेली ओढ दिल्याने महापालिकेने दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबरोबरच आता शहरातील सार्वजनिक, खासगी जलतरण तलाव आणि वॉशिंग सेंटर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. इमारतींच्या बांधकामांसाठी पिण्याचे पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली असून, कूपनलिकेचे पाणी वापरण्याची सक्ती करण्यात आली आहे. आदेशाचे पालन न केल्यास दोन वेळा दहा हजारांचा दंड, तर तिसऱ्यांदा संबंधितांविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करणार आहे.

उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून महापालिकेने पाणी बचतीसाठी विविध उपाययोजन केल्या आहेत. त्यानुसार जलतरण तलाव, वॉशिंग सेंटर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी आदेश काढले आहेत.

आदेशाचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. पहिल्यांदा पाण्याचा गैरवापर केल्यास दहा हजार रुपये, दुसऱ्यांदा नियमांचे पालन न केल्यास पुन्हा दहा हजार रुपये दंड आकारला जाणार आहे. तिसऱ्यांदा पाण्याचा गैरवापर केल्यास महापालिकेकडून फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबधित विभागांना देण्यात आल्या आहेत.



### महापालिकेच्या सूचना

**» आंघोळ, भांडी, कपडे धुवण्यासाठी आवश्यक तेवढ्याच पाण्याचा वापर करावा.वाहन धुवणे, अंगण किंवा पदपथ स्वच्छ करणे यासाठी कूपनलिका किंवा पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये.खासगी उद्यानांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर बंद करावा. पिण्याचे पाणी वापरल्यास दहा रुपये दंड आकारला जाणार आहे.खासगी सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) सुरू करून त्या पाण्याचा पुनर्वापर उद्यानांसाठी करावा. पाण्याच्या पाण्याच्या टाक्यांना 'ऑटोमेटिक फ्लोट व्हॉल्व्ह' चा वापर करावा. टाकीतून पाणी वाहत असल्याचे आढळल्यास संबंधितांना दहा हजार रुपये दंड केला जाणार आहे.कोणत्याही बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरण्यात येऊ नये, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी), कूपनलिका, विहिरीचे पाणी वापरण्यात यावे. बांधकाम विभागांतील संबंधित अभियंता यांच्याकडून पाहणी केली जाणार आहे.बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरल्याचे आढळून आल्यास बांधकाम थांबवून संबंधितांना दहा हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.**

# आषाढी वारीसाठी आरोग्य विभाग सज्ज

## वारी मार्गावर दर 5 किमीवर मिळणार आरोग्य सुविधा; 108 रुग्णवाहिका तैनात

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारीनिमित्त वारकरी, भाविकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग सज्ज झाला आहे. वारी मार्गात दर पाच किलोमीटर अंतरावर प्रथमोपचार सुविधा, औषधसाठा आणि रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकीत पुणे, सातारा, सोलापूर आणि पंढरपूर परिसरात वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधा, प्रथमोपचार केंद्रे, रुग्णवाहिका सेवा, औषधसाठा, मनुष्यबळ नियोजन आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. बैठकीला सहसंचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, उपसंचालक डॉ. बबिता कमलापूरकर, उपसंचालक धूम, पुणे विभागाचे उपसंचालक भगवान पवार, तसेच पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्यांतील वरिष्ठ आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक आणि १०८ रुग्णवाहिका सेवेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

काटकर म्हणाले, 'वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून, सेवाभावाची संधी आहे. प्रत्येक वारकऱ्याला आपुलकीने आरोग्य सेवा मिळाली पाहिजे. वारी काळात सेवा देणारे डॉक्टर, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवक यांच्यासाठीही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या. वारी मार्गावरील आशा स्वयंसेविका, आरोग्य सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांना 'आरोग्यदूत' म्हणून कार्यरत करावे.'

वारी मार्गावरील प्रमुख मुक्कामस्थळी उष्माघात, निर्जलीकरण, पायांच्या जखमा तसेच संसर्गजन्य आजारांवर तातडीने उपचार करण्यासाठी विशेष वैद्यकीय पथके तैनात करण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, स्वच्छता आणि अन्नसुरक्षेवरही विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसादासाठी नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.



### पाणी, स्वच्छता आणि नियंत्रण कक्षावर भर

» वारीदरम्यान आरोग्य सुरक्षेसाठी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, स्वच्छता आणि अन्नसुरक्षा यावर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. विविध जिल्ह्यांतील आरोग्य अधिकारी आणि १०८ रुग्णवाहिका सेवेच्या समन्वयातून संपूर्ण यंत्रणा कार्यरत राहील. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरित प्रतिसाद देण्यासाठी विशेष नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येणार आहे. पुणे, सातारा, सोलापूर आणि पंढरपूर परिसरातील आरोग्य यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली असून, वारकऱ्यांच्या आरोग्याची संपूर्ण जबाबदारी घेण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

### वारी मार्गावर विशेष वैद्यकीय सुविधा

» वारी मार्गावरील प्रमुख मुक्कामस्थळी प्रथमोपचार केंद्रे, औषधसाठा आणि रुग्णवाहिका सेवा उपलब्ध राहणार आहे. दर पाच किलोमीटर अंतरावर वैद्यकीय मदत केंद्र उभारण्यात येणार असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार देण्यासाठी विशेष वैद्यकीय पथके तैनात केली जातील. उष्माघात, निर्जलीकरण, पायांच्या जखमा तसेच संसर्गजन्य आजारांवर तातडीने उपचार करता यावेत यासाठी आवश्यक औषधे आणि मनुष्यबळाची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि सुलभ आरोग्यसेवा मिळणार आहे.

### आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर

» आषाढी वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून सेवाभावाची मोठी संधी असल्याचे आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी सांगितले. वारी मार्गावर प्रत्येक वारकऱ्याला वेळेत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले आहे. डॉक्टर, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवक यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच आशा स्वयंसेविका, आरोग्य सेविका आणि इतर कर्मचारी 'आरोग्यदूत' म्हणून कार्यरत राहणार असून, वारकऱ्यांना तत्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

# पुणेकरांना मोठा दिलासा! उंड्री आणि बावधनमध्ये सुरू होणार नवीन टँकर पॉईंट

## प्रवाशांसाठी मोठी सुविधा; मेट्रो आणि बस सेवा एकत्र येणार, वेळ व खर्चात बचत

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरात देण्यात येणाऱ्या टँकरच्या पाण्याची मागणी दिवसाला सरासरी २०० ने वाढली आहे. यानुसार पालिकेकडून शहरात दोन नवीन टँकर पॉईंट उभारण्यात येत आहेत. उंड्री भागासाठी दोराबजी मॉल येथील पाण्याच्या टाकीच्या परिसरात तसेच बावधन येथील जागेत हे टँकर पाईंट उभारले जाणार आहेत. पाणीकपातीनंतर महापालिकेकडे आलेल्या तक्रारींचा आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त नवनीत कौर यांनी शनिवारी पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

यानुसार दोन टँकर पॉईंट सुरू करण्यासह नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना पाणी पुरवठा विभागास देण्यात आल्या. सध्या, शहरात पर्वती, पद्मावती, रामटेकडी, एरंडवणे, वडगावशेरी, पाषाण, येरवडा, चतुःशृंगी, धायरी हे टँकर पॉईंट सुरू आहेत. यातील हडपसर आणि परिसरात रामटेकडी तसेच पर्वती केंद्रातून पाणी दिले जात होते. त्यामुळे टँकरला १० ते २० कि.मी. चा फेरा पडत होता. बावधन आणि वारजे परिसरासाठी पाषाण आणि चतुःशृंगी टँकर भरणा केंद्रातून पाणी दिले जात होते. मात्र, बावधनलाच स्वतंत्र पॉईंट झाल्यास या भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महापालिकेकडून शहरात देण्यात येणाऱ्या टँकरच्या पाण्याची मागणी दिवसाला सरासरी २०० ने वाढली आहे. यानुसार पालिकेकडून शहरात दोन नवीन टँकर पॉईंट उभारण्यात येत आहेत. उंड्री भागासाठी दोराबजी मॉल येथील पाण्याच्या टाकीच्या परिसरात तसेच बावधन येथील जागेत हे टँकर पाईंट उभारले जाणार आहेत.




### टेल एन्ड परिसरात अडचणी...

» शहरात दिवसाआड पाणीकपातीमुळे जलवाहिनीच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचण्यास अडचणी येत आहेत. तसेच, या भागात कमी दाबाने पाणी कमी येत आहे. त्यामुळे अशा भागातून पाण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. प्रामुख्याने कमी दाबाने पाणी येणे तसेच १० ते १५ मिनिटे पाणी मिळत असल्याच्या तक्रारी सर्वाधिक आहेत. त्यामुळे अशा भागात जास्तीत जास्त पाणी देण्यासाठी नियोजनाच्या वेळेत बदल करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्तांनी दिले आहेत.